लोकमत

सांगली, गुरुवार, दि. २५ सप्टेंबर २०१४

# धर्माच्या पलीकडे जाऊन पर्यावरणाचा विचार हवा

## अमित सरोदे : सांगलीत व्याख्यान

सांगली : देशात राहणाऱ्या सर्वांनीच आपल्या धर्माच्या पलीकडे जाऊन पर्यावरणाचा विचार करणे आवश्यक आहे. तरच भविष्यकाळात पर्यावरण संवर्धनाला चांगले दिवस येतील, असे मत ॲड. असीम सरोदे यांनी व्यक्त केले. वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'स्मार्ट सिटी' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

ॲड. सरोदे म्हणाले की, पर्यावरण हा व्यापक विषय असून त्याकडे सगळ्यांनीच डोळसपणे पाहिले पाहिजे. आपले जे सण आहेत, त्यामध्ये पर्यावरणाचा विचार प्राधान्याने केलेला आहे. सध्या सणांना केवळ उत्सवाचे स्वरुप आले आहे. कर्णकर्कश्श आवाजात लावण्यात येणाऱ्या ध्वनिक्षेपकांचा त्रास वास्तविक सामान्यांना होत असतो. परंतु याविरोधात कोणी आवाज उठविताना दिसत नाही. असा मोठा आवाज सहन करुन आपण एकप्रकारे आपल्या शरीर आणि मनावरच अत्याचार करीत असतो. नागरिकांनी कोणतीही भीडभाड न बाळगता संबंधितांविरोधात आवाज उठविला पाहिजे. अमेरिकेत पर्यावरणाबाबत नागरिक जागरुक आहेत. तशी जागृती आपल्याकडे



दिसली पाहिजे. विविध कारखान्यांतून आरोग्यास अपायकारक धूर हवेत सोडला जातो. सांडपाणी सर्रास नदी अथवा तलावात सोडले जाते. परिणामी याचा फटका नागरिकांनाच बसतो आणि त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो.

उद्योग उभारताना संबंधितांनी पर्यावरणाचा विचार अग्रक्रमाने करायला पाहिजे. पर्यावरणाविषयी केवळ वैचारिक प्रबोधन करुन काहीही होणार नाही.

यापुढे पर्यावरणाची हानी करणाऱ्यांविरोधात न्यायालयात धाव घेतली पाहिजे. यामुळेच खऱ्या प्रबोधनाला प्रारंभ होईल, असेही त्यांनी सांगितले.

रोटरी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात वीरेंद्र चित्राव, ॲड. अमित शिंदे, महेश कराडकर, वास्तुविशारद प्रमोद चौगुले उपस्थित होते. (प्रतिनिधी)